महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर जिल्हा) या विधानसभा क्षेत्रातील अल्पसंख्याक समुदायाच्या विकासाबाबत

(१) २२८५४ (०६-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर जिल्हा) या विधानसभा क्षेत्रातील अल्पसंख्याक समुदायाच्या विकासाकरीता महसूल विषयक बाबीसाठी आवश्यक त्या सोयीसुविधांचे लाभ प्रत्यार्पित करण्यासाठी स्थानिय नागरीक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांनी मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास) मा.राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास), जिल्हाधिकारी (मुंबई पूर्व उपनगर) यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम किती कालावधीत सुरु करण्यात येईल,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मे, २०१५ अखेरपर्यंत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-१२-२०१७) : (१), (२) व (३) मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर जिल्हा) या विधानसभा क्षेत्रातील अल्पसंख्याक समुदायाच्या विकासाकरीता महसूल विषयक बाबीसाठी आवश्यक त्या सोयीसुविधांचे लाभ प्रत्यार्पित करण्यासाठी मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास) मा.राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास), जिल्हाधिकारी (मुंबई पूर्व उपनगरे) यांच्या कार्यालयातील अभिलेखांत शिफारस केल्याचे आढळून आलेले नाही असे अल्पसंख्याक विभागाने तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी कळविले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी अधिक कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाबिज प्रक्रिया केंद्र शिवनी (जि.अकोला) लगत असलेल्या शासकीय जागेवर अनेक व्यावसायीकांनी अतिक्रमण केल्याबाबत

(२) ३३८६५ (२३-१२-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरालगत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील महाबिज बीज प्रक्रिया केंद्र, शिवनी लगत असलेल्या शासकीय जागेवर अनेक व्यावसायीकांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमणाकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असून या अधिकाऱ्यांच्या लेखी याबाबत काही नोंद आहे काय,

(३) असल्यास, उक्त अतिक्रमण हटविण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१७) : (१), (२), व (३) अकोला शहराजवळ महाबिज बीज प्रक्रिया केंद्र शिवनी लगत मौजे शिवणी येथील स.नं. १०७, १२६ व १२३ आहेत. स.नं. १०७ मध्ये कृषी संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे तर्फे बीज परिक्षण अधिकारी, अकोला यांच्या मालकीची ०.२५ हे. आर जमीन आहे. स.नं.१२६ मधील संपुर्ण १.६१ हे. आर क्षेत्र अकोला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खदानीसाठी घेण्यात आले आहे. स. नं. १२३ क्षेत्रातील खदानचे पोटखराब क्षेत्र ६.७० हे. आर असून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ लगत ०.२३ हे. आर क्षेत्र खाजगी जमीन आहे. सदर खाजगी जमिनीवर गॅरेज, घरे, दुकाने व मटन बाजार इत्यादी दुकानांनी क्षेत्र व्यापलेले आहे. अकोला, महानगरपालिकेची हद्दवाढ दि. ३०/०८/२०१६ रोजी झालेली असून उक्त महानगरपालिकेने गॅरेज, घरे, दुकाने व मटन बाजार इत्यादी यांना परवानगी दिलेली नाही. या ठिकाणी कोणतीही शासकीय जमीन उपलब्ध नाही. त्यामुळे शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मानखुर्द (मुंबई) येथील स्क्रॅप डिलर्ससाठी आरक्षित असलेल्या जमिनीबाबत

(३) ४२०९९ (०७-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील घाटकोपर-मानखुर्द जोडरस्त्यास लागून असलेल्या मानखुर्द येथील स्क्रॅप डिलर्ससाठी आरक्षित असलेल्या जमिनीची मागणी महाराष्ट्र स्क्रॅप डिलर्स असोसिएशने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात दिवसेंदिवस झपाटयाने अतिक्रमण वाढत असल्यामुळे स्क्रॅप डिलर्ससाठी आरक्षित असलेल्या उपरोक्त जमिनीचा योग्य वापर न केल्यास सदर ठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्क्रॅप डिलर्ससाठी आरक्षित असलेली उपरोक्त जमीन महाराष्ट्र स्क्रॅप डिलर्स असोसिएशन यांना तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१७) : (१), (२) व (३) महाराष्ट्र स्क्रॅप डिलर्स असोशिएशन यांनी घाटकोपर-मानखुर्द जोडरस्त्यास लागून असलेल्या मौजे मानखुर्द येथील स.नं. १३८ न.भू.क्र. १ पै व मौजे मंडाळा न.भू.क्र. ६/१ पै. येथील शासकीय जमिनीची मागणी भंगार साठविण्यासाठी केलेली आहे. तथापि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि. १०/०१/२०१७ रोजीच्या आदेशान्वये मागणी केलेली जमीन मुंबई मेट्रो-३ प्रकल्पाच्या कास्टींग यार्ड यासाठी काही अटी/शर्तीवर मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन या कंपनीला ७ वर्षाच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरित करण्यात आली आहे. सदर जमीन वाटपास निर्बाध्यरित्या उपलब्ध नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या भूमी अभिलेख विभागाकडून मिळकत पत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) ऑनलाईन पध्दतीने मिळण्याबाबत

(४) ४३६८० (२०-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या भूमी अभिलेख विभागाने मिळकत पत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) ऑनलाईन पध्दतीने देण्याच्या योजनेचे काम माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यामधील ३८४ नगर भूमापन कार्यालयामध्ये संगणक प्रणाली देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील भूमी अभिलेख कार्यालय नोंदणी विभागाच्या दुय्यम निबंधक कार्यालयाशी ऑनलाईन पध्दतीने जाडले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, योजनेसाठी भूमी अभिलेख विभागाने पाठविलेल्या १६ कोटी रुपयांच्या प्रस्तावास अद्याप मंजूरी दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) राज्यात ऑनलाईन मिळकत पत्रिका वितरीत करण्यासाठी आवश्यक ती संगणक प्रणाली "ई-पी. सी. आय. एस." विकसित करण्यासंदर्भात जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या रु.१८.८७ कोटीच्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाने दि.३१.०३.२०१७ रोजी मान्यता दिली आहे.

सदर "ई-पी. सी. आय. एस." प्रणाली अंतर्गत भूमी अभिलेख कार्यालयासोबतच दुय्यम निबंधक कार्यालयाची जोडणी करणे नियोजित आहे. सदर संगणक प्रणाली राज्यातील सर्व नगर भूमापन कार्यालयांमध्ये राबविण्याचे संकल्पित आहे.

मौजे दिवाणमान, आचोळे, चुळणे, गास, सोपारे व गिरिज (ता.वसई, जि.पालघर) येथील मिठागरांसाठी दिलेल्या लीजच्या जमिनी वसई-विरार शहर महानगरपालिकेस मिळणेबाबत

(५) ४९४१५ (०७-०५-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दिवाणमान, आचोळे, चुळणे, गास, सोपारे व गिरिज (ता.वसई, जि.पालघर) येथील मिठागरांसाठी दिलेल्या जमिनीची लीज मुदत माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये संपलेली असल्याने शासनाने सदरहू जमिनीवर मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (BKC) च्या धर्तीवर शैक्षणिक आरोग्य सुविधा व रोजगार निर्मिती केंद्र निर्माण करण्यासाठी सदरहू मिठागरांची जमीन वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे देण्यात यावी याबाबतची मागणी तेथील महापौर, तसेच पालघर जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-११-२०१७) : (१) होय.

(२) व (३) मलप्रक्रिया केंद्र, माध्यमिक शाळा, समाज केंद्र तसेच विशेष विकास क्षेत्र या आरक्षणांसाठी वसई- विरार शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३७(१) अन्वये ठराव मंजूर करुन प्रस्ताव राज्यशासनाच्या नगर विकास विभागाकडे मान्यतेसाठी सादर केला असून, त्यामध्ये गोगटे सॉल्ट ॲन्ड केमिकल्स यांना भाडेपट्टयाने मंजूर करण्यात आलेल्या क्षेत्रापैकी सुमारे ५९२-७१.५९ हे.आर क्षेत्राचा समावेश आहे. नगर विकास विभागाकडून महानगरपालिकेच्या प्रस्तावाबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर सदर शासकीय जमीन महानगरपालिकेला मंजूर करण्याबाबत कार्यवाही करता येईल.

उरण (जि.रायगड) येथे नविन तहसिल कार्यालय उभारणीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाकडे मंजूरीसाठी पाठविल्याबाबत

(६) ५३६८७ (२८-०९-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील नविन तहसिल कार्यालय उभारणीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाकडे मंजूरीसाठी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय व याकरिता किती निधी उपलब्ध करुन दिला आहे,
(३) असल्यास, सदर कार्यालयाचे बांधकाम केव्हापासून सुरु करण्यात येणार असून किती कालावधीत हे बांधकाम पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (११-१२-२०१७) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

सद्यस्थितीत नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी मौजे बोरीपाखडी, ता.उरण येथे जमीन उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्यामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे. जागेच्या उपलब्धतेनंतर नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजन आहे.

औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील नागेशवाडी व जिल्ह्यामधील १६५ तलाठी भवन रिक्त असल्याबाबत

(७) ५८१६७ (१९-०८-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील नागेशवाडी व जिल्ह्यामधील १६५ तलाठी भवन रिक्त असून त्यावर केलेला लाखों रुपायांचा खर्च व्यर्थ गेला असल्याचे सन २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १६५ तलाठी भवनाचा पूरेपूर वापर व्हावा यायसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-११-२०१७) : (१) हे खरे नाही.

नागेशवाडी तालुका औढा ना. येथील तलाठी भवनाचा ताबा दि.१३/०६/२०१६ रोजी संबंधित तलाठी यांना देण्यात आला असून तेथील कामकाज तलाठी भवनातून करण्यात येत आहे.
हिंगोली जिल्हयात ५२ तलाठी कार्यालये शासकीय इमारतीत असून ७ तलाठी कार्यालये बांधण्यात येत आहेत.
(२) सर्व तलाठी यांनी त्यांच्या क्षेत्रातील त्यांच्या मुख्यालयी वास्तव्यास राहण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दि.०२/११/२०१६ च्या पत्रान्वये जिल्ह्यातील सर्व उप विभागीय अधिकारी व तहसिलदार यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मोहोपाडा (जि.रायगड) येथील ग्रामस्थांकडून एचओसीने सन १९६२ मध्ये खरेदी केलेल्या जमिनीबाबत

(८) ६५४०६ (१६-१२-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोपाडा (जि.रायगड) येथील ग्रामस्थांकडून एचओसीने सन १९६२ मध्ये ७०० ते ८०० रुपये एकर दराने जमिनी घेऊन सदर जमिनी सन १९६५ मध्ये एमआयडीसीला वर्ग केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोहोपाडा येथील प्रकल्पग्रस्तांच्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे सेबीचे प्रशिक्षण केंद उभारणीचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत काही प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नसून सदर मोबदला एजंटनी घेतला असल्याने याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली असल्याची बाब माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१७) : (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे मोहोपाडा येथील एच.ओ.सी. कंपनीसाठी शासनाकडून पनवेल तालुक्यातील ५ गावांतील ३१७.३९.१ हे.आर क्षेत्र व खालापूर तालुक्यातील ३ गावांतील ४७३.१६.७७ हे.आर क्षेत्र असे एकूण ८ गावांतील ७९०.५५.८७ हे.आर क्षेत्र सन १९६० मध्ये संपादित करण्यात आले आहे. सदर संपादन हे भूसंपादन अधिनियम, १८९४ प्रमाणे करण्यात आलेले आहे. त्यापैकी ५४२.५९.३ हे. आर क्षेत्र प्रत्यक्ष एचओसी कंपनीच्या ताब्यात आहे. त्या क्षेत्रापैकी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळा (एमआयडीसी) कडे १३२.४३.८१ हे.आर क्षेत्र हस्तांतरित करण्यात आलेले आहे. उर्वरित क्षेत्र एचआयएल कंपनी, महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळ (एमएसईबी), एमएआयडीसीकडे व शासनाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे.
(२) एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या जमिनीपैकी भूखंड क्र.आयएस-१ व आयएस-२, एकूण २,४९,६८६ चौ.मी.इतके क्षेत्र नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट यांना महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाने भाडेपट्टयावर (लीज) दिलेली आहे.
(३) अशा प्रकारची कोणतीही तक्रार जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयात दाखल झालेली नाही. संपादित जमिनीच्या शेतकऱ्यांची सत्यता पडताळणी केल्यानंतर नुकसान भरपाईची रक्कम प्रकल्पग्रस्तांना अदा केली जाते.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

बोईसर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयासाठी दिलेली जागा ताब्यात देण्याबाबत

(९) ६७५११ (१६-१२-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयासाठी काटकरपाडा, सर्व्हे.नं.१०७/१ अ(३) ही जागा मंजूर झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ९ मार्च, २०१६ रोजी जमीनीची मोजणी होऊनही अद्याप जमीन रुग्णालयाच्या ताब्यात देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी बहुल जिल्हयात आरोग्यसेवेचा गंभीर प्रश्न पाहता सदर जागा रुग्णालयाच्या ताब्यात तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) मौजे-बोईसर (काटकर) ता.पालघर येथील जुना स.नं १०७/१अ/६, नविन स.नं.३०/१ ते ६४/३३ येथील एकूण क्षेत्र ४ एकर जमिनीचा आगाऊ ताबा ग्रामीण रुग्णालय बांधण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग (जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे) यांना काही अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यास शासन आदेश दिनांक ०१/०३/२०१३ अन्वये मान्यता देण्यात आली होती. तथापि उप वनसंरक्षक डहाणू यांनी मौजे काटकर जि.पालघर येथील जूना सर्व्हे क्रमांक १०७ नविन गट क्र.३०/१ ते ६४ हा बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट ६१५४(ड) दिनांक २९.०७.१९०५ अन्वये "संरक्षित वन" म्हणून घोषित झालेले असून सदर क्षेत्राचे निर्वनीकरण झालेले नसल्याने त्याचा वैधानिक दर्जा "संरक्षित वन" असल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविले आहे. सदर जमिनीचा वापर हा वनेत्तर कामासाठी होणार असल्याने वनक्षेत्रावर वनेत्तर कामे करावयाची झाल्यास केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. प्रकरणी वन विभागाकडून पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. दरम्यान उप वन संरक्षक डहाणू, वन विभाग डहाणू यांनी दिनांक ०९.११.२०१७ च्या आदेशान्वये मौजे बोईसर (काटकर) जुना स.नं.१०७/१अ/६ नविन स.नं.३०/१ ते ६४/११ क्षेत्र ०-९९.०० हे.आर जमीन अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ अंतर्गत कलम ३(२) च्या तरतुदीने जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांना अटी व शर्तीने देण्यात आलेली आहे.

मेहकर येथील विवेकानंद नगर व भिमनगर (जि.बुलडाणा) येथील रहिवाशांना गट नंबर ६ मधील ई क्लास जमिनी कायमस्वरुपी भाडेपट्ट्याने देण्याबाबत

(१०) ६९३५२ (१६-१२-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर येथील विवेकानंद नगर व भिमनगर (जि.बुलडाणा) येथील गट नंबर ६ मधील ई-क्लास जमिनीवर ४० वर्षापासून राहणाऱ्या रहिवाशांना कायमस्वरुपी भाडेपट्ट्याने जागा देण्याबाबत ग्रामपंचायत समितीने ग्रामसभेत ठराव मंजूर करुन तहसिलदार मेहकर यांना दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेऊन सदर रहिवाशांना भाडेपट्ट्याने जागा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१८) : (१), (२), (३) व (४) मौजे विवेकानंद नगर व भिमनगर, ता. मेहकर, जि. बुलढाणा येथील ई वर्ग, गट नंबर ६ मधील जमिनीवर ४० वर्षापासून राहणा-या रहिवाशांना कायमस्वरुपी भाडेपट्याने जागा देण्याबाबतचा ठराव ग्रामसभेत मंजूर करून सरपंच गट ग्रामपंचायत, विवेकानंदनगर यांनी तहसिलदार, मेहकर, जि. बुलढ़ाणा यांना दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी सादर केला होता. तथापि सदर रहिवाशांना शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.१२/०७/२०११ मधील "गायरान/गुरचरण अथवा गावक-यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणत्याही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येवू नये" या तरतूदीस अनुसरून सदरहू जमीन मंजूर करता येत नसल्याचे तहसिलदार, मेहकर यांनी दि. ०१/०९/२०१६ च्या पत्रान्वये सरपंच/सचिव गट ग्रामपंचायत, विवेकानंदनगर यांना कळविले आहे.

सरपडोह (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील जमिनीवरील
देवस्थानचा वर्ग-३ असा शेरा कमी करण्याबाबत

(११) ७१३८५ (२४-०१-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरपडोह (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील वर्ग २ चा शेरा कमी करून तिथे देवस्थानचा वर्ग-३ असा शेरा मारला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वर्ग ३ च्या शेऱ्यामुळे येथील ग्रामस्थांना या जमिनीवर कोणतेही कर्ज काढता येत नाही अथवा जमिन विकताही येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिनीवरील वर्ग-३ चा शेरा कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-०१-२०१८) : (१), (२), (३), (४) Archivist, Pune Archives, Pune, Government of Maharashtra Land Alienation Register, Taluka-Karmala अन्वये मौजे सरपडोह, ता.करमाळा, जि.सोलापूर या गावच्या संपूर्ण क्षेत्राची नोंद (स.नं.५९ वगळता) इनाम वर्ग ३ असल्याने सरपडोह येथील संपूर्ण सर्व्हे नंबर व हल्लीचे गट नंबरच्या ७/१२ मधील सत्ता प्रकार रकान्यामध्ये इनाम वर्ग ३ अशी नोंद घेणे आवश्यक होती. तथापि, ७/१२ च्या उता-यावर वर्ग २ अशी चुकीची नोंद नमूद असल्याने तहसीलदार करमाळा यांनी

दि.०३/१२/२०१५ च्या आदेशान्वये सदर गावच्या ७/१२ उताऱ्यावरील भूधारणा पद्धतीमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम १५५ नुसार इनाम वर्ग ३ ची नोंद केलेली आहे.

सदर आदेशाविरुद्ध उपविभागीय अधिकारी, माढा यांच्या न्यायालयात दाखल आरटीएस अपिल क्र. १६६/२०१५ मध्ये उपविभागीय अधिकारी माढा यांनी तहसीलदार करमाळा यांचे आदेश कायम केले आहेत.

त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणी मौजे सरपडोह येथील जमिनीचे उताऱ्यावरील वर्ग-३ चा शेरा Land Alienation Register मधील नोंदीनुसार ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामस्थ व शेतक-यांना सातबाराचे संगणकीकृत उतारे मिळण्याबाबत

(१२) ७३८७३ (१२-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्राम स्तरावर कार्यरत असणाऱ्या तलाठी वर्गाकडून ग्रामस्थ व शेतक-यांना सातबाराचे उतारे संगणकीकृत मिळावेत यासाठी महसूल विभागाकडून करण्यात येणारे अद्ययावतीकरनाचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अद्ययावतीकरनाची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी संपली असतानाही राज्यातील सर्व जिल्ह्यातून अद्यापपावेतो संगणकीकृत साताबारा उतारे देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी महसूल विभागाने संगणकीकृत सातबारे देण्याबाबत दोन वेळा मुदतवाढ दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्यःस्थितीत राज्यातील किती जिल्ह्यातून संगणकीकृत सातबारा ग्रामस्थ व शेतक-यांना देण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) "ई-फेरफार" कार्यक्रम राज्यात राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला असून राज्यातील ३५८ पैकी ३५७ तालुक्यांचा (चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुका वगळून) संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चा डाटा स्टेट डाटा सेंटरवर अपलोड करण्यात आला असून हस्तलिखित गा.न.नं.७/१२ चे वितरण बंद करुन ऑनलाईन फेरफाराची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. विविध तांत्रिक

अडचणींमुळे जेथे संगणकीकृत गा.न.नं.७/१२ वितरीत करणे शक्य नव्हते तेथे दि.३०.०४.२०१७ पर्यंतच्या कालावधीत विशिष्ट मर्यादित प्रयोजनांसाठी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ वितरीत करण्यास शासनाने परवानगी दिली होती.

अधिकार अभिलेखांच्या संगणकीकरणावेळी डाटा एन्ट्री व डाटा कन्व्हर्जनच्या झालेल्या चुका निदर्शनास आल्याने संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील नोंदी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी तंतोतंत जुळविण्याकरीता शासनाने मे, २०१६ मध्ये "ई-फेरफार" आज्ञावली अंतर्गत एडीट मॉड्यूल सर्व तलाठ्यांना उपलब्ध करुन दिले. त्यानुसार सर्व तलाठ्यांकडून संगणकीकृत गा.न.नं.७/१२ हे हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी जुळविण्याची कार्यवाही करण्यात आली. एडिट मोड्युल अंतर्गत केलेल्या कामाची तपासणी करण्यासाठी शासनाने दिनांक १५ मे, २०१७ पासून चावडी वाचनाची विशेष मोहिम राबविण्याचा निर्णय घेतला. सदर मोहिमेत संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मध्ये आढळून आलेल्या चूका दुरूस्त करण्यासाठी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्यातर्फे रि-एडीट (Re-Edit) मॉड्यूल ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून सदर मोड्यूलचा वापर करून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ हस्तलिखित अधिकार अभिलेखांशी जुळविण्याची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. एडीट व रि-एडीट मोड्यूल चे काम तात्काळ पूर्ण करून घेण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील इकोसेन्सीटीव्ह झोनला ग्रामसभांमधून विरोध असल्याबाबत

(१३) ७६३८६ (१२-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील इकोसेन्सीटीव्ह झोनबाबत विविध ग्रामसभांमध्ये विरोधाचा ठराव करुन ग्रामस्थांनी सदर ठराव माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठरावांच्या अनुषंगाने महसूल व खनिकर्म विभागाने खनीज उत्खनन करण्यास तेथील ग्रामस्थांना परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) तसे ठराव नसल्याने त्यानुषंगाने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील तहसिलदार कार्यालयाच्या दुरवस्थेबाबत

(१४) ७७५१४ (१२-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील तहसिल कार्यालयाची दुरवस्था झाली असून जूने व महत्वाचे दस्तऐवज वेळेवर मिळत नसल्यामुळे नागरीकांना वारंवार कार्यालयात यावे लागत असल्याच्या तक्रारी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्राप्त झाल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यालयातील अस्वच्छता व कामकाजातील दिरंगाई व कर्मचाऱ्यांच्या अरेरावी वृत्तीमुळे सामान्य नागरीकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१७) : (१) हे खरे नाही. ठाणे तहसिल कार्यालयातील रेकॉर्ड रुम अद्यावत करण्यात आलेली असून सर्व दस्तऐवज अ, ब, क, ड या श्रेणीत व्यवस्थित ठेवण्यात आलेली असून, ६ गठ्ठे पध्दतीने अभिलेख लावण्यात आलेले आहेत.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील मनमाड-नांदगांव राज्य मार्ग वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याबाबत

(१५) ७९०९६ (१३-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील मनमाड नांदगांव राज्य मार्गावर पानेवाडी ऑईल टर्मिनल परिसरात रस्ता अरुंद तसेच अतिशय खड्डेयुक्त व खराब झाल्यामुळे या रस्त्यावर सातत्याने अपघात होवून अनेक नागरीकांचे मृत्यू व काही नागरीक गंभीर जख्मी झाल्यामुळे मनमाड नांदगांव राज्य मार्ग वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे,
(३) असल्यास, चौकशीनुसार उपरोक्त रस्त्यावर अपघाताचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-११-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राजूरी (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील मुस्लीम बांधवांसाठी दफनभूमी उपलब्ध नसल्याबाबत

(१६) ७९५२२ (२०-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरी (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील मुस्लीम बांधवांसाठी दफनभूमी उपलब्ध नसल्याने त्यांना खाजगी जागेत अंत्यसंस्कार करावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गट नं.८१ मधील गायरान जमीनीत दफनभूमीची नोंद असून सदर जागा दफनभूमीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थ व मुस्लीमबांधव यांच्याकडून वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने राजूरी येथील मुस्लीम बांधवांना दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१७) : (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) राजूरी, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील ग.नं.८१ चे एकूण क्षेत्र ३ हे. ७५ आर असून त्यापैकी २ हे. ५४ आर क्षेत्र गायरान सरपंच ग्रामपंचायत राजूरी यांच्या नावे असून उर्वरीत १ हे. २१ आर क्षेत्र वनसंज्ञे खाली आहे. उक्त जमिनीपैकी ० हे. २० आर जागा स्मशानभूमीसाठी व ० हे. २५ आर जागा गावठाणाकडे वर्ग केल्याची नोंद दिसून येते. ग्रामस्थ मुस्लिम बांधव हे ग.नं.८१ मधील गायरान क्षेत्रापैकी ० हे. १० आर क्षेत्र दफनभूमीसाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी करत आहेत.

(३) मुस्लिम बांधवांना दफनभूमीसाठी ० हे. १० आर क्षेत्र उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २२ नुसार अभिहस्तांकन करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ऑनलाईन सात-बारा नोंदणीची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

(१७) ८००६४ (१२-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बहुतेक तालुक्यांच्या ठिकाणी तांत्रिक पाठबळाचा अभाव आणि कर्मचाऱ्यांना पुरेसे तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे सातबाराच्या ऑनलाईन नोंदी रखडल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक ठिकाणी नवीन नोंदी करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली नसल्याने महसूल, जमीन व्यवहार, दावे इत्यादी प्रकरणांतील निकालही अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलडाणा व मोताळा (जि.बुलडाणा) तालुक्यातील २० टक्के तलाठीच ऑनलाईन काम करु शकत असल्याने नागरिकांची अनेक प्रकरणे रखडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना तांत्रिक पाठबळ व तांत्रिक ज्ञान देण्याबाबत तसेच बुलडाणा व मोताळा तालुक्यातील तलाठ्यांना ऑनलाईन काम करण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांची संगणक अर्हता वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-११-२०१७) : (१), (२) व (३) असे निदर्शनास आले नाही.

(४) व (५) भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद येथे फेब्रुवारी-२०१३ मध्ये ६७९ व जून-२०१५ मध्ये ५०१ असे मिळुन सर्व जिल्हयातील ११८० मास्टर ट्रेनर यांना ई-फेरफार आज्ञावलीचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्यामध्ये उपजिल्हाधिकारी (डी.डी.ई.), नायब तहसिलदार (डी.बी.ए.),मंडळ अधिकारी व तलाठी यांचा समावेश असून या मास्टर ट्रेनर्सच्या मदतीने जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांनी सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना ई फेरफार आज्ञावलीचे प्रशिक्षण दिलेले आहे.

तसेच राज्य स्तरावर जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख यांच्या कार्यालयात २९१ तलाठी व मंडळ अधिकारी यांना दि.०६.०६.२०१६ रोजी ई फेरफार आज्ञावलीमधील 'एडीट मॉड्यूल' च्या वापराचे प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांच्या मदतीने जिल्हा स्तरावर सर्व तलाठी/मंडळ अधिकारी यांना एडीट मॉड्यूलच्या वापराचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे येथे डाटा बेस ॲडमिनिस्ट्रेटर (DBA) व सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर यांची नियुक्ती करण्यात आली असून ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणीमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी यांना काही अडचणी आल्यास त्या सर्व अडचणी तात्काळ दूर करण्याच्या दृष्टीने जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे कार्यालयात प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र ई-फेरफार मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच राज्यातील सर्व जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी व डिस्ट्रिक्ट डोमेन एक्सपर्ट यांना ई-फेरफार आज्ञावली सपोर्ट बाबत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

राज्यातील गौण खनिज ठिकाणे व रेतीघाटावर ड्रोनव्दारे देखरेख व नियंत्रण ठेवण्याबाबत

(१८) ८२८८० (१२-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गौण खनिज ठिकाणे व रेतीघाटावर ड्रोनव्दारे देखरेख व नियंत्रण ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला असून भंडारा जिल्ह्यात या निर्णयाची अद्यापी अंमलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतीनिधिनी मा.महसूलमंत्री यांना दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-०१-२०१८) : (१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी "ड्रोनद्वारे रेतीघाटावर देखरेख करण्याच्या राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाची भंडारा जिल्ह्यात अंमलबजावणी होत नसल्याबाबत" चे दि.१२/०२/२०१७ रोजीचे निवेदन मा. मंत्री (महसूल) यांना प्राप्त झाले आहे.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.३७४/२०१५ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी भंडारा यांनी भंडारा जिल्ह्यातील रेतीघाटांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण व देखरेख करण्यासाठी दि.१/०४/२०१७ पासून २ महिन्यांकरीता भंडारा जिल्ह्यातील रेतीघाटांची देखरेख व सर्वेक्षण करण्यासाठी खाजगी संस्थेची नियुक्ती केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्रातील सर्व देवस्थानांना गैरमार्गाने लावलेले कुळ काढून देवस्थानांची शेती देवस्थानांना मिळण्याबाबत

(१९) ८२८९८ (१२-०४-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील सर्व देवस्थानांना गैरमार्गाने लावलेले कुळ काढून देवस्थानांची शेती देवस्थानांना देण्याबाबत मा.मंत्री महसूल यांनी कार्यालयीन पत्र जा.क्र/मंत्री/म.ब.पु.सांबां/ व्ही.आय.पी. २००८६६०/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी अकोला यांना आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी अकोला यांनी त्यांचे पत्र क्र.कक्ष-११/अका/ भूसुधार/कावि-/१/ २०१७ दिनांक ९/१/२०१७ नुसार जिल्ह्यातील सर्व उप विभागीय अधिकारी (राजस्व) व तहसीलदार यांना चौकशी करून नियमानुसार योग्य कार्यवाही करावी असे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीमध्ये याबाबतची किती प्रकरणे आढळून आली व उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) देवस्थानांना गैरमार्गाने लावलेले कुळ काढून देवस्थानांची शेती देवस्थानांना देणेबाबत मा.मंत्री (महसूल) यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांना आदेशित केले होते. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांनी दि.९/१/२०१७ च्या पत्रान्वये अकोला जिल्ह्यातील सर्व उप विभागीय अधिकारी व तहसिलदार यांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते. सदर चौकशीअंति अकोला जिल्ह्यात अशी प्रकरणे आढळून आली नाहीत.

अहमदनगर शहरातील सावेडी गावठाणाची भूमी अभिलेख कार्यालयात नोंद नसल्याबाबत

(२०) ८३११८ (१२-०४-२०१७). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरातील सावेडी गावठाणाची भूमी अभिलेख कार्यालयात नोंद नसल्याने त्या भागातील जमीनीचे ७/१२ उतारे निघत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१८) : (१), (२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी अहमदनगर जिल्ह्यातील मौजे सावेडी गावाचे आकारबंदाप्रमाणे एकूण क्षेत्र १३९९-०६.७२ हेक्टर-आर एवढे आहे. त्यापैकी मौजे सावेडी या गावाचे गावठाणाचे ४ हेक्टर ४८ आर एवढे क्षेत्र हे आकारबंदाचे नाकिर्दसार मध्ये समाविष्ट आहे.

गावठाणात ७/१२ स्वरुपात अधिकार अभिलेख ठेवण्यात येत नाहीत. सावेडी गावठाणाची नोंद अभिलेखात आहे. मात्र त्या गावठाणास नगर भूमापन योजना लागू नसल्याने, गावठाणातील मिळकतींच्या मिळकत पत्रिका नागरिकांस देता येत नाही. तथापि, मौजे सावेडी गावठाण हे अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट असल्याने सदर गावठाण जागेतील मिळकत उतारे हे अहमदनगर महानगरपालिकेकडून नागरिकांना उपलब्ध करुन दिले जातात. तसेच सावेडी गावातील एकूण ५४ सर्व्हे नंबर हे नगर रचना योजना क्रमांक ४ मध्ये समाविष्ट असल्याने, त्यांना अंतिम भूखंड क्रमांक १ ते २८० असे देण्यात आलेले असून त्याबाबतचे मिळकत पत्रिकांचे उतारे नागरिकांना नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर यांच्याकडून उपलब्ध करुन दिले जातात व उर्वरीत सर्व्हे नंबरचे गा.न.नं.७/१२ उतारे हे मौजे सावेडी तलाठी यांच्याकडून नागरिकांना पुरविले जातात.

अहमदनगर महानगरपालिका यांनी सावेडीसह महानगरपालिका हद्दीतील इतर सर्व समाविष्ट होणाऱ्या गावांचे विस्तारीत नगर भूमापन करणे संबंधी महासभा ठराव व खर्च अदा करण्यास मान्यता दिल्यास सदर गावठाणासह अहमदनगर महानगरपालिकेच्या विस्तारीत क्षेत्राच्या भूमापनाबाबत शासनस्तरावर उचित निर्णय घेणे शक्य होईल.

करंजी ते जिरा मीरा या रस्त्याचे जिल्हा परिषद बांधकाम विभागाने केलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(२१) ८३५३९ (१७-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजी ते जिरा मिरा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) हा दहा कि.मी.चा रस्ता जिल्हा परिषद बांधकाम विभागातंर्गत असल्याने या रस्त्यावर खड्डे भरण्याचे काम करण्यात आले असून सदर काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारावर व निकृष्ट दर्जाच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि चारा छावणी गैरव्यवहाराबाबत

(२२) ८४७१६ (१२-०४-२०१७). श्री.रमेश कदम (मोहोळ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि चारा छावणी गैरव्यवहार प्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकारी दोषी असल्याबाबतचा अहवाल पुराव्यासह सन २०१२-२०१३ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी, श्री.प्रविण गेडाम यांनी सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार उक्त प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर तसेच त्यांना मदत करणाऱ्या इतर संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) : (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

वरळी (मुंबई) येथील शासकीय वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत

(२३) ८४८२६ (१५-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, मुंबई येथील गंगा, जमुना, सरस्वती, आर.जी. थल्लानी मार्ग व सर पोचखानवाला मार्ग येथील पोलीस, शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या वसाहतीची व वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदरहू वसाहतीची आणि वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-११-२०१७) : (१) नाही, तथापि सदर इमारतींच्या दुरुस्ती व नुतनीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार दिलेल्या प्रत्यक्ष भेटीच्या वेळी सदर दुरुस्तीच्या कामाबाबत तोंडी सूचना दिलेल्या आहेत.

(२) वरळी मुंबई येथील गंगा, जमुना, सरस्वती येथील निवासस्थानांच्या दुरुस्तीचे कामे निधीच्या उपलब्धतेनुसार तसेच प्राधान्यक्रमानुसार हाती घेणे प्रस्तावित आहे.

सर पोचखानवाला मार्ग, वरळी येथील गृह विभागाच्या इमारतींच्या दुरुस्तीकरिता गृह विभागाने एकूण रु. ७०९.४० रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून कामे निविदा स्तरावर आहेत. निविदा निश्चितीनंतर कामे हाती घेवून त्वरित पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील आगरी कोळी बांधवांच्या समाज मंदिरासाठी भूखंड देण्याबाबत

(२४) ८५१०६ (१२-०८-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आगरी कोळी बांधव राहत असून त्यांनी समाज भवन उभारण्यासाठी शासनाकडे शासकीय भूखंडाची मागणी केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून आगरी कोळी बांधवांच्या समाज मंदिरासाठी भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१८) : (१), (२) व (३) ठाणे जिल्ह्यामध्ये आगरी कोळी समाजाकरीता समाज भवन बांधणेसाठी भूखंड मिळण्याची मागणी विविध स्तरावरुन करण्यात आलेली आहे.

तथापि, मागणी केलेल्या ठिकाणी शासकीय जमीन निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध नसल्याचे संबंधीतांना कळविण्यात आले आहे.

माझगाव, मुंबई येथील भाडेपट्टा संपुष्टात आलेली मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत.

(२५) ८५४१६ (१२-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव, मुंबई येथील महसूल विभागातील, सीएससक्र. १२६ मधील भाडेपट्टा संपुष्टात आलेली मालमत्ता शासनाच्या परवानगीविना तीन विकासकांना बेकायदा हस्तांतरीत केल्यामुळे सदर मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये संबंधिताना नोटीस बजावली असतानाही शासनाने सदर मालमत्ता अद्याप ताब्यात घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मालमत्ता ताब्यात घेण्यास शासनाला लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त मालमत्ता त्वरीत ताब्यात घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदर मालमत्ता किती कालावधीत शासन ताब्यात घेणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-११-२०१७) : (१) माझगांव येथील नवीन सर्व्हे नं.२/३६०५ मधील शासकीय जमीन भाडेपट्टाकराराने दि.१.९.१९०३ पासून दि वुमेन्स फॉरेन मिशनरी सोसायटी ऑफ दि मेथॉडीस्ट ऑपिस्कोपल चर्च यांना ९९ वर्षांकरीता भाडेपट्टयाने देण्यात आलेली होती. सदर जमीन दि.२३.८.१९१८ रोजी दि वुमेन्स फॉरेन मिशनरी सोसायटी ऑफ दि मेथॉडीस्ट ऑपिस्कोपल चर्च यांनी श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांना भाडेकराराद्वारे (Deed of Assignment) दिली. त्याच दिवशी एका स्वतंत्र खरेदीखताद्वारे उक्त सोसायटीने नवीन सर्व्हे क्र. १/३६०५ व ३/३६०५ हे भूखंड देखिल श्री.कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्ट यांना विकले. नगर भूमापनाच्यावेळी उक्त नवीन सर्व्हे क्र.२/३६०५ याचे सर्व्हे क्र.१/३६०५ व ३/३६०५ यांच्यासह रुपांतरण भूकर क्र.१२६ मध्ये झाले व श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांनी सदर भूकर क्र. १२६ मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना दि.२४.५.२०१० च्या खरेदी खताने विकल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यावेळी मुळ सर्व्हे नं.२/३६०५ याची भाडेपट्टयाची मुदत संपलेली होती.

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडून श्री.कच्छी लोहाना निवास गृह त्यांचे ट्रस्टी तसेच गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांचे विरुध्द भायखळा पोलिस स्टेशन येथे एफ. आय. आर. क्र.२३२/२०१६, दि.१६.८.२०१६ अन्वये गुन्हा नोंद केलेला आहे.

तुर्भे, नवी मुंबई येथील डम्पिंग ग्राउंडसाठी ३४ एकर जागा मोफत मिळणेबाबत

(२६) ८५४४९ (१२-०८-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुर्भे, नवी मुंबई येथील डम्पिंग ग्राउंडची क्षमता संपुष्टात आल्यामुळे घनकचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी शासनाने सदर ग्राउंड शेजारी ३४ एकर जागा मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ३४ एकर जागेसाठी १९४ कोटी रुपये भरण्याबाबत शासनाने नवी मुंबई महापालिकेला माहे मे, २०१७ मध्ये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे १९४ कोटी रुपये भरणे महापालिकेला शक्य नसल्याने सदरची जागा मोफत मिळण्याबाबतचा प्रस्ताव महापालिकेने शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१७) : (१), (२), (३), (४) व (५) शासन ज्ञापन दिनांक १४/०३/२०१७ अन्वये मौजे तुर्भे, ता.जि. ठाणे येथील ३४.०० एकर क्षेत्राचा क्षेपणभूमीच्या विकासासाठी उक्त शासकीय जमिन क्षेपनभूमी/घनकचरा व्यवस्थापन या प्रयोजनासाठी राखीव अथवा आरक्षित नसल्याने सदर जमिनीचे प्रचलित दराने शीघ्रसिध्द गणकानुसार होणारे भोगवटामूल्य वसुल करून ज्ञापनात नमुद अटी शर्तीच्या अधीन राहून, आगावू ताबा देण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे यांनी दिनांक २७/०३/२०१७ च्या पत्रान्वये आयुक्त नवी मुंबई महानगरपालिकेस रु. १८४,८३,३२,०००/- एवढी रक्कम तहसिलदार ठाणे यांचे कार्यालयात भरून शासनजमा करणेबाबत कळविले आहे.

सदर जमिनीच्या भोगवटामूल्याची रक्कम शासनजमा न करता, महापालिकेस मंजूर झालेली मौजे तुर्भे येथील ३४ एकर जमिन घनकचरा व्यवस्थापन, क्षेपनभूमीचा विकास करणेसाठी महसूलमूक्त व सारामाफीने मिळणेबाबत आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १६/०३/२०१७ व १२/०६/२०१७ अन्वये शासनांस व दिनांक ३१/०३/२०१७ चे पत्रान्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्या कार्यालयास विनंती केली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने केलेल्या विनंतीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे यांच्या कार्यालयाकडून विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे मार्फत शासनांस प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

कांबा (ता.खालापूर, जि.रायगड) या गावाजवळील पाताळगंगा नदीवर असलेल्या पुलाला संरक्षक कठडा बसविण्याबाबत

(२७) ८५९७१ (१२-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांबा (ता.खालापूर, जि.रायगड) या गावाजवळील पाताळगंगा नदीवर असलेल्या पुलाला संरक्षक कठडा नसल्याने सदर पुलावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालक व प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल चांभार्ली व कांबे या गावांत जाने येणे करण्यासाठी उपयुक्त असून पूल बांधून चार ते पाच वर्ष झाले असतांनाही पुलाला संरक्षक कठडा बसविण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर पुलाला संरक्षक कठडा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-११-२०१७) : (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सद्यस्थितीत पूलाच्या कठडयाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

कोल्हापूर जिल्हयातील शासकीय कार्यालयाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल व फायर ऑडिट करण्याबाबत

(२८) ८६०९७ (१२-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शासकीय कार्यालयाच्या इमारतीचे स्ट्रक्चलर व फायर ऑडिट अद्यापपर्यंत करण्यात आले नसल्याने या इमारती धोकादायक झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासकीय कार्यालयात महत्वाचे दस्तऐवज असल्याने या इमारतीच्या सुरक्षेबाबत व या इमारतीचे स्ट्रक्चलर व फायर ऑडिट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (११-१२-२०१७) : (१) व (२) इमारतीचे स्ट्रक्चरल व फायर ऑडीट करण्याची जबाबदारी उपभोक्ता विभागाची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील कोल्हापूर विभागातील १८ इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट पूर्ण करण्यात आले असून सदर इमारती संरचनात्मकदृष्ट्या स्थिर असून कोणताही गंभीर दोष नाही. उर्वरीत इमारतींची निधीच्या उपलब्धतेनुसार संरचनात्मक तपासणी करण्याचे नियोजन आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन व महत्त्वाच्या इमारतींचे फायर ऑडीट करण्यात आले असून उर्वरीत इमारतींचे फायर ऑडीट मुख्य अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका कोल्हापूर यांच्यामार्फत करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मालवण (जि.सिंधुदुर्ग) तहसिल कार्यालयातील अधिकारी उपस्थित राहत नसल्याबाबत

(२९) ८६४०९ (१२-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तहसिल कार्यालयातील अधिकारी उपस्थित राहत नसल्यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयात फे-या माराव्या लागत असून विविध दाखले मिळविण्याकरिता मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिल कार्यालयातील सेतु विभागाकडून दाखले देण्याची मुदत संपल्यानंतरही नागरिकांना दाखले दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणी जबाबदार असणा-या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (११-१२-२०१७) : (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

संगणकीकृत सात-बारा उता-यातील चुकानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(३०) ८७२७६ (१२-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चावडी वाचन मोहिमेत जर संगणकीकृत सात-बारा उताऱ्यात चुक आढळली तर संबधित तलाठी, मंडळ अधिकारी व वरिष्ठ महसूल अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असे आदेश राज्याचे जमाबंदी आयुक्त यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता राज्य शासनाने २४ मुद्द्यांबाबत एक मोहिम हाती घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मोहिमेचे काम किती टप्प्यात व किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१८) : (१), (२), (३) व (४) "ई-फेरफार" कार्यक्रम राज्यात राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला. राज्यातील ३५८ पैकी ३५७ तालुक्यांचा (चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुका वगळून) संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चा डाटा स्टेट डाटा सेंटरवर अपलोड करण्यात आला असून हस्तलिखित गा.न.नं.७/१२ चे वितरण बंद करुन ऑनलाईन फेरफाराची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

अधिकार अभिलेखांच्या संगणकीकरणावेळी डाटा एन्ट्री व डाटा कन्व्हर्जनच्या झालेल्या चुका निदर्शनास आल्याने संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील नोंदी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी तंतोतंत जुळविण्याकरीता शासनाने मे, २०१६ मध्ये "ई-फेरफार" आज्ञावली अंतर्गत एडीट मॉड्यूल सर्व तलाठ्यांना उपलब्ध करुन दिले. त्यानुसार सर्व तलाठ्यांकडून संगणकीकृत गा.न.नं.७/१२ हे हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी जुळविण्याची कार्यवाही करण्यात आली. एडिट मोड्युल अंतर्गत केलेल्या कामाच्या अचूकतेची खातरजमा करण्यासाठी शासनाने दिनांक १५ मे, २०१७ पासून चावडी वाचनाची विशेष मोहिम राबविण्याचा निर्णय घेतला. सदर मोहिमेत संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मध्ये आढळून आलेल्या चूका दुरूस्त करण्यासाठी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्यातर्फे रि-एडीट (Re-Edit) मॉड्यूल ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून सदर मोड्यूलचा वापर करून दि.१३.११.२०१७ पर्यंत २१२७९ गावांतील संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ हस्तलिखित अधिकार अभिलेखांशी जुळविण्यात आले आहेत. हे काम दि.३१.१२.२०१७ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

तसेच जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या दि.०५.०५.२०१७ च्या परिपत्रकान्वये सदर मोहिमेअंतर्गत अचुक संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील नोंदीच्या अचूकतेची तपासणी करण्यासाठी महसूल अधिकारी/कर्मचारी यांना २४ मुद्यांची तपासणी सूची देण्यात आलेली आहे. सदर मोहिमेचे काम हे (१) ऑनलाईन तपासणी (२) चावडी वाचन व (३) चावडी वाचनानंतर दुरुस्ती व तपासणी अशा ३ टप्प्यात करण्यात येत असून तिसऱ्या टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतरही गा.न.नं.७/१२ मध्ये त्रुटी / चूका आढळून आल्यास त्याची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे आदेश जमाबंदी आयुक्त यांच्या दि.०५.०५.२०१७ च्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत.

आजरा (ता.आजरा, जि.कोल्हापूर) शहरालगत असलेल्या संस्थानकालीन ऐतिहासिक गंगा बाग, नारायण बाग आणि व्यंकटेश बाग या जागेच्या भूसंपादनाबाबत

(३१) ८७६३४ (१२-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा (ता.आजरा, जि.कोल्हापूर) शहरालगत असलेल्या संस्थानकालीन ऐतिहासिक गंगा बाग, नारायण बाग आणि व्यंकटेश बाग असलेल्या जागेचे भूदरगड प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर जमीनीचे भूदरगड प्रकल्पासाठी भूसंपादन न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१७) : (१) हे खरे नाही.

आजरा तालुक्यात प्रश्नाधीन जागेबाबतच्या भूसंपादनाची कोणतीही कार्यवाही जिल्हाधिकारी, कोल्हापूर कार्यालयाकडे सुरू नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा धामोरी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील गावठाण भूमापनाबाबत

(३२) ८८०६० (१२-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा धामोरी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील गावठाण भूमापनाचे काम पूर्ण करुन गावठाण भूमापन अधिकार अभिलेख तयार करण्याच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,

(२) असल्यास, सदर काम पूर्ण करून ग्रामस्थांना पीआर कार्ड उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१८) : (१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मौजे धामोरी, ता. भातकुली, जि. अमरावती येथील गावठाण भूमापनामधील मिळकतींचे सविस्तर भूमापनाचे काम पूर्ण झाले असून सदर गावामध्ये एकूण ७ नगर भूमापन आलेख व एकूण ६६० मिळकती आहेत. सदर मिळकतींची सविस्तर मोजणी माहे जून, २०१७ मध्ये पूर्ण झाली असून महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २० (२) अन्वये नगर भूमापन हक्क चौकशीचे

काम पूर्ण करुन संबंधित मिळकतीचे धारक घोषित केलेले आहेत. त्यानुसार सदर मिळकत पत्रिकांचे अधिकार अभिलेख, सनद व मिळकत पत्रिका तयार करणे तसेच घटकदर प्रस्ताव तयार करण्याचे काम उप अधीक्षक भूमी अभिलेख, भातकुली यांच्यामार्फत सुरु आहे.

सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संबंधित गाव परिरक्षणास घेवून तेथील संबंधित ग्रामस्थांना मिळकत पत्रिका उपलब्ध करुन देण्यात येतील.

पुणे महसुल विभागात अतिरिक्त आयुक्त हे नवीन पद निर्माण करण्याबाबत

(३३) ८८४५२ (१२-०८-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महसुल विभागात प्रलंबित महसूल दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने अतिरिक्त आयुक्त हे नवीन एक पद निर्माण करावे किंवा त्याजागी उपायुक्तांची नेमणुक करावी असा प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी शासनाकडे पाठविला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून पुणे महसुल विभागात अतिरिक्त आयुक्त हे नवीन पद निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१८) : (१) होय.

(२) व (३) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयातील उप आयुक्त, करमणूक कर शाखा या पदाची श्रेणीवाढ करुन अतिरिक्त आयुक्त, यांचे एक नवीन पदाची निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

उमरेड (जि.नागपूर) येथील भूमी अभिलेख कार्यालयातील गैरव्यवहार

(३४) ८९९२१ (१९-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.नागपूर) येथील भूमी अभिलेख कार्यालयात शेती अथवा घराची मोजणी करताना साधारण मोजणी पावती फाडून तातडीची मोजणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ ते ३० सप्टेंबर, २०१६ च्या अंकेक्षण अहवालात नमूद करण्यात आल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरचा गैरप्रकार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-११-२०१७) : (१), (२), (३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी उपसंचालक भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर कार्यालयाकडून दि.०१.१०.२०१५ ते दि. ३०.०९.२०१६ या कालावधीत उप अधीक्षक भूमि अभिलेख, उमरेड कार्यालयाच्या काढण्यात आलेल्या वार्षिक निरीक्षण ज्ञापामध्ये, ज्ञाप कालावधीत काही साधारण मोजणीची प्रकरणे तातडीने निकाली काढल्याचे निदर्शनास आले आहे. तद्नंतर दि.०३.०३.२०१७ रोजी निरीक्षण ज्ञाप वाचनावेळी ई-मोजणी आज्ञावलीमध्ये नियोजनात अनधिकृत बदल केल्याचे दिसून आल्याने तसेच, या संदर्भात तालुका उमरेड येथील नागरिकांकडून प्राप्त तक्रारीची चौकशी करुन उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर, प्रदेश नागपूर यांनी प्रस्तुत प्रकरणातील संबंधित कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु केली आहे.

गोरेगाव (पूर्व), (जि.मुंबई उपनगर) येथील नागरी निवारा संकुलातील सदनिका हस्तांतरनास परवानगी देण्याबाबत

(३५) ८९७० (१२-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (पूर्व), (जि.मुंबई उपनगर) येथील नागरी निवारा संकुलातील ३०० हून अधिक पुनःखरेदी सदनिका धारकांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचेकडे सदनिका हस्तांतरीत करण्याच्या पूर्व परवानगीसाठी अर्ज सादर करुनही अद्यापी सदरहू सदनिका हस्तांतरीत करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू सदनिका हस्तांतरन प्रकरणी तत्कालीन महसूल मंत्री यांचे सोबत झालेल्या बैठकीत, मा.मंत्री महोदयांनी सदनिका हस्तांतरीत करण्याबाबतचे आदेश संबंधीतांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणच्या सदनिका हस्तांतरनास परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१७) : (१), (२) व (३) गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन ज्ञापन दि. १६/०२/१९९१ अन्वये, नागरी जमीन कमाल धारणा कायदा १९७६ अंतर्गत, स.नं. २३९/१, मौजे मालाड, (जि.मुंबई उपनगर) येथील अतिरिक्त मोकळी जमीन म्हणून उपलब्ध झालेली ६२ एकर जमीन नागरी निवारा परिषदेअंतर्गत गठीत होणाऱ्या सहकारी संस्थांना प्रदान करण्यात आली आहे. सदर जमिनीमध्ये नागरी निवारा परिषदेने रेखांकन मंजूर करून त्यामध्ये ११३ सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात आलेल्या असून यांमध्ये सुमारे ६००० सदनिका आहेत.

सदर संस्थांमधील सदनिका हस्तांतरण करण्याकरिता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे जून २०१६ पासून आजपर्यंत एकूण ५२९ अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी ३५५ अर्जदारांना सदनिका हस्तांतरणासाठी "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यात आलेले आहेत. तसेच हस्तांतरण शुल्क भरण्यासाठी २२ अर्जदारांना कळविण्यात आलेले आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विहीत केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत १३१ अर्जदारांना कळविण्यात आलेले असून उर्वरीत २१ प्रकरणांवर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयाकडून प्रशासकिय कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील सेव्हन हिल येथील उड्डाणपूलावरील डांबर उखडल्याबाबत

(३६) ९०४९८ (१९-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील सेव्हन हिल येथील उड्डाणपूलावर सन २०१२ मध्ये मास्टिक तंत्रज्ञानातून डांबरीकरणाच्या चादरी अंथरण्याचे काम करण्यात आले असून या कामासाठी ७ वर्षांची डिफेट लायबिलिटी पिरीयड (D.L.F.) असताना ३ वर्षातच सबंधित पूलावरील डांबर उखडण्यास सुरवात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी DLF किती वर्षाचा होता ती संचीका व मेजर बुक बांधकाम विभागातून गहाळ झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उड्डाणपुलाचे निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारावर तसेच सबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) सदर कामाचा दोषदायित्व कालावधी ५ वर्षाचा होता. कामाची संचिका विभागात उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत

(३७) ९०५६४ (२३-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील सिडको बसस्थानक ते हर्सुल टी पॉइंट या पाच किलो मीटरच्या रस्त्यावर आंबेडकर चौक, शरद टी पॉईंट, हर्सुल जंक्शन या रस्त्यावरील तीनही चौकात

रस्त्यांचे खोदकाम करून पाईप टाकून ते सर्व्हिस रस्त्यात असलेल्या स्ट्रोम वाटर गटरात सोडून त्यानंतर त्यावर डांबरीकरण करणे अपेक्षित असतांना सिमेंटचे पाईप न टाकताच डांबरीकरण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सबंधित कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-११-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयातील ४५००० गटांच्या सातबारा मध्ये तफावत झाल्याबाबत

(३८) ९१११४४ (१२-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने संगणीकीकरण करून जमीन धारकांना ७/१२ उतारे मिळण्याची ऑनलाईन कार्यपद्धती सुरु केल्यानंतर पुणे जिल्हयात तब्बल ४५००० गटांच्या सातबारा मध्ये तफावत झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सातबारा उताऱ्यांमध्ये चुकीच्या नोंदीची व एक जमीन अनेकांना विकण्याच्या नोंदीची किती प्रकरणे तालुकानिहाय निदर्शनास आली आहे,

(३) असल्यास, या चुकीच्या नोंदी सुधारण्याबाबत व सातबारा उताऱ्यांवर चुकीच्या नोंदी करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-११-२०१७) : (१), (२), (३) व (४) पुणे जिल्हयातील अनेक गटांच्या गा.न.नं.७/१२ वरील क्षेत्र आणि प्रत्यक्षातील क्षेत्र यात तफावत आढळते, ही बाब खरी आहे. सदरच्या चुका या गा.न.नं.७/१२ चे पोटहिस्से पाडताना, कमी जास्त पत्रके तयार करताना, गा.न.नं.७/१२ पुनर्लेखन / प्रख्यापन करताना व मंजूर फेरफार अंमल घेताना हस्तदोषामुळे होऊ शकतात. पुणे जिल्हयात चावडी वाचनादरम्यान निदर्शनास आलेल्या गा.न.नं.७/१२ संगणकीकरणातील तफावती दुरुस्त करुन गा.न.नं.७/१२ अद्यावत करण्याचे काम सुरु आहे.

सदरच्या तफावती या तांत्रिक स्वरुपाच्या असून या तफावतींमुळे पुणे जिल्हयात एक जमीन अनेकांना विकण्याची प्रकरणे निदर्शनास आलेली नाहीत. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १५५ व २५७ अन्वये अशा चूका दुरुस्त करण्याविषयी तरतूद करण्यात आलेली आहे.

मौजा मांडवे तर्फे बामणगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील
सर्व्हे नं. ५१/९ या जागेतील अनधिकृत बांधकामाबाबत

(३९) ९१२१२ (१९-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मांडवे तर्फे बामणगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सर्व्हे नं. ५१/९ या जागेसाठी श्री.निलेश जयसिंद मोरे यांना जिल्हाधिकारी, रायगड यांनी बिनशेतीसह बांधकाम परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जागेवर बांधकाम करताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार रस्त्याच्या मध्यापासून ४० मीटरच्या आत बांधकाम करण्यात येऊ नये अशी अट असतांना श्री.मोरे यांनी नियमांचा भंग करुन अनधिकृतपणे साडेबारा मीटर अंतरावर बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.मोरे यांच्या या कृतीबाबत नागरिकांनी त्यांची परवानगी रद्द करण्याची मागणी केली असून जिल्हाधिकारी यांनी याबाबत चौकशी करण्याचे आदेश देऊनसुद्धा तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी या अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरुध्द तसेच सदर अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१८) : (१) मौजे मांडवे तर्फे बामणगांव येथील गट नं.५० व गट नं ५१/९ या मिळकतीस जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक १६.११.२०१५ च्या आदेशान्वये अटी व शर्तीस अधीन राहून निवासी व वाणिज्य या कारणासाठी बिनशेती व बांधकाम परवानगी देण्यात आली होती.

(२) श्री.निलेश जयहिंद मोरे यांनी अलिबाग-मुरुड रस्त्याच्या मध्यापासून १४ ते १५ मीटर अंतरावर बांधकाम केले असून मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ व सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक ०९.०३.२००१ मधील तरतुदीनुसार नियमांचा भंग करण्यात आला आहे.

(३) (४) व (५) तहसिलदार, अलिबाग यांचेकडे दिनांक ३०.०५.२०१४ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी,चौल यांचे मार्फत चौकशी केली असता श्री.निलेश जयहिंद मोरे यांनी अनधिकृत बांधकाम केल्याचे आढळल्याने तहसिलदार, अलिबाग यांनी दिनांक २५.०८.२०१४ रोजी श्री.मोरे यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४५ अन्वये नोटीस बजावली होती. सदर नोटीसीस खुलासा सादर न केल्याने दिनांक ०५.०९.२०१४ रोजी सदर अनधिकृत बांधकामाबाबत रु.७३,८००/- इतकी रक्कम शासनजमा करणेबाबत नोटीस बजावण्यात आली त्यानुसार श्री.मोरे यांचेकडून सदरची रक्कम दिनांक ०५.०९.२०१४ रोजी शासनजमा करण्यात आली होती. तद्नंतर तहसिलदार, अलिबाग यांचेकडे उक्त बांधकामाबाबत

दिनांक ३०.०६.२०१६ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, चौल यांनी चौकशी केली असता श्री.मोरे यांनी अलिबाग-मुरुड रस्त्याच्या मध्यापासून १४ ते १५ मीटर अंतरावर बांधकाम केल्याचे तसेच मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ व सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक ०९.०३.२००१ मधील तरतुदीनुसार नियमांचा भंग केल्याचे स्पष्ट झाले. त्यानुषंगाने तहसिलदार, अलिबाग यांनी सदरचे बांधकाम तात्काळ निष्कासित करणेबाबत दिनांक २९.०६.२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग यांना देखील दिनांक २९.०६.२०१७ च्या पत्रान्वये रस्त्याच्या विहीत केलेल्या अंतराच्या आत बांधकाम होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणाचे सर्वेक्षण करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(४०) ९१८०९ (१२-०८-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणाचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-११-२०१७) : (१), (२) व (३) बृहन्मुंबई मधील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करुन सिमांकन करण्यासाठी अनुसरावी लागणारी कार्यपध्दती व त्यासंबधीची मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी महसूल व वन विभागाने दि.२०/११/२०१२ रोजी उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. जुलै, २०१३ मध्ये प्राप्त सदर समितीच्या अहवालान्वये या विषयी अनुसरावी लागणारी कार्यपध्दती व त्यासंबधीची मार्गदर्शक तत्वे याबाबतच्या शिफारसी शासनास प्राप्त झाल्या आहेत. मात्र, समितीच्या अहवालात नमूद कोळीवाड्यांची संख्या व केंद्र शासनाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्याच्या सागरी मत्स्यव्यवसाय जनगणना, २०१० अहवालातील कोळीवाड्यांची संख्या यात फरक असल्याने उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या नेतृत्वाखालील पथकाने प्रत्यक्ष स्थळपहाणी करण्याचे निर्देश दि.६.०४.२०१५ रोजी देण्यात आले. त्यानुसार बृहन्मुंबई क्षेत्रातील कोळीवाड्यांची प्रत्यक्ष स्थळ पहाणी करण्याची कार्यवाही सुरु आहे. यासंदर्भात मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे मे, २०१७ मध्ये झालेल्या बैठकीतही बृहन्मुंबईतील कोळीवाड्यांच्या हद्दी निश्चित करण्याच्यादृष्टीने सर्व संबंधित प्राधिकरणांच्या प्रतिनिधींसह स्थळपहाणी करुन आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील जमिनीवरील सर्व धारकांना वहीवाटीप्रमाणे ७/१२ उतारा वेगळा करून मिळणेबाबत

(४१) ९१८८७ (१९-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूमी अभिलेख यांचेकडील क्र.एल.आर. ११५३/भू.उ/२००१ दि.२९/०९/२००२ चे परिपत्रकाप्रमाणे या विभागाकडून करण्यात येणारी पोट हिस्सा मोजणी हि जमिनीच्या जागेवर मोजनीवेळी दाखवण्यात येणाऱ्या वहीवाटीनुसार करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वहीवाटीप्रमाणे येणाऱ्या क्षेत्रानुसार अभिलेख दुरुस्तीची कार्यवाही केली जात असून त्यासाठी सर्व सहधारकांच्या संमतीदर्शक स्वाक्षऱ्या घेवून विहित नमुन्यातील मोजणी अर्ज भूमिअभिलेख कार्यालयाकडे सदर करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीच्या एखाद्या धारकाने सदर ७/१२ वर स्वाक्षरी देण्यास नकार दिल्यास वरील परिपत्रकानुसार ७/१२ वेगळा करता येत नसून मोजणी करण्यास अडथळा निर्माण होऊन शेतकऱ्यांमध्ये वादाचे प्रसंग निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वहीवाटीप्रमाणे मोजणी व ७/१२ उतारा वेगळा करून मिळणेसाठी सदर परिपत्रकामध्ये बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-११-२०१७) : (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) मोजणी वेळी गा.न.नं. ७/१२ वर सहधारकांची स्वाक्षरी घेण्यात येत नाही.

जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या दि. २९.०१.२००२ च्या परिपत्रकानुसार, ज्या जमिनीची मोजणी करावयाची आहे, अशा जमिनीच्या संबंधित सर्व सहधारकांना व लगत धारक/ कब्जेदार यांना मोजणी तारीख व वेळ देवून मोजणीवेळी उपस्थित राहण्याबाबत नोटीस देण्यात येते व मोजणी दिवशी प्रत्यक्ष गावी जावून खातेदारांच्या समक्ष ते वहिवाट दाखवतील त्या प्रमाणे व एकूण क्षेत्राशी अनुसरुन मोजणी करण्यात येते. त्याचवेळी गुणाकार बुकावर (हिस्सा फॉर्म नं.४) सर्व संबंधित खातेदारांच्या सहया/अंगठे घेण्यात येतात व तद्नंतर कार्यालयात आकारफोड काम पुर्ण करुन फाळणीबारा (गटबुक, हिस्सा फॉर्म नं.११ व १२ इत्यादी) गावी अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासाठी पाठविण्यात येते. त्यानुसार, गुणाकार बुकावर (हिस्सा फॉम नं.४) एखाद्या सहधारकाने स्वाक्षरी करण्यास नकार दिला तर सदर मोजणी प्रकरणी अभिलेख दुरुस्तीची कार्यवाही केली जात नाही.

प्रस्तुत प्रकरणी या संदर्भातील पोटहिस्सा मोजणीच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील दसरा मैदान येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत

(४२) ९२३९४ (२१-०८-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील दसरा मैदान येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याकरिता आवश्यक असलेल्या जागेचा आगाऊ ताबा मिळण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्रधान सचिव, महसूल यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महसूल विभागाचे अवर सचिव यांनी दिनांक ३ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांना जमिनीचा आगाऊ ताबा मिळण्याच्या दृष्टीने त्वरित कार्यवाही करण्याचे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२२-११-२०१७) : (१) मौजे उल्हासनगर, ता.उल्हासनगर, जि.ठाणे येथील सी.टी.एस. क्र. २७५२१ येथे तालुकास्तरीय क्रीडा संकुल उभारण्याकामी त्वरीत कार्यवाही करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८/०२/२०१७ च्या पत्रान्वये केली होती. त्यानुषंगाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत दिनांक ०३/०३/२०१७ च्या शासन पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले आहे.

(२) व (३) मौजे उल्हासनगर, ता.उल्हासनगर, जि.ठाणे येथील सी.टी.एस. क्र. २७५२१ क्षेत्र १६१६१ चौ.मी. पैकी क्षेत्र १२६३० चौ.मी. या क्षेत्राचा आगाऊ ताबा तालुका क्रीडा संकुल उभारण्याकामी जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक २४/०८/२०१७ च्या आदेशान्वये देण्यात आला आहे.

आखाडा बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे अवैध वाळु वाहतुक करणा-या टिप्परने तलाठयाच्या दुचाकीला धक्का दिल्याबाबत

(४३) ९२४६५ (१२-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) या ठिकाणी अवैध वाळु वाहतुक करणा-या टिप्परला हात दाखवून अडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या तलाठयाच्या दुचाकीवर टिप्पर चालकाने टिप्पर नेला असून वेळीच दुचाकीवरून उडी मारल्यामुळे तलाठी महिनाथ दंडीमे हे बचावले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त तलाठ्याच्या दुचाकीवर टिप्पर नेऊन त्यांना जीवे मारू पाहणाऱ्या टिप्पर चालक व त्याच्या मालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) : (१) होय.
(२) व (३) तलाठ्याच्या दुचाकीवर टिप्पर नेऊन जिवे मारु पाहणाऱ्या आरोपी टिप्पर चालक व त्याच्या मालकावर तलाठी यांच्या फिर्यादीवरुन बाळापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन आरोपीविरुध्द मा.प्रथम वर्ग न्यायालय, कळमनुरी येथे दोषारोप पत्र क्र.५१/२०१७, दिनांक १७/६/२०१७ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट झाले नसल्याबाबत

(४४) ९२९२४ (१९-०८-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरूर (जि.पुणे) शहराजवळील पुणे-नगर महमार्गावर घोडनदीवर १५० वर्षापुर्वी ऊभारलेला पूल व त्याच्या शेजारी २० वर्षापुर्वी उभारलेला समांतर पुल मोठ्या वाहनांच्या वाहतुकीने हालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील ३१ ब्रिटीश कालीन पुलापैकी २१ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महाड येथील दुर्घटनेनंतर राज्यातील सर्व जुन्या व नविन पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे आदेश देण्यात आले असताना पुणे जिल्ह्यातील २१ पुलांचे स्ट्रकचरल ऑडीट न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, पुणे-नगर महमार्गावरील उक्त दोन्ही पुलांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१७) : (१) पुणे-शिरुर -अहमदनगर रस्त्यावर १ ब्रिटीश कालीन पुल असून त्यास समांतर खाजगीकरणांतर्गत सन २००९ मध्ये १ नविन पुल बांधलेला आहे. सदर नविन पुलावर अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे थोडया प्रमाणात हादरे बसत असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतू हे हादरे अवजड वाहनांमुळे व पुलाच्या बिअरिंगमुळे निर्माण होत आहेत. जुन्या पुलावर अशा प्रकारचे हादरे आढळून येत नाही. सदर दोन्ही पुलांचे खाजगी सल्लागारामार्फत स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असून त्यानुसार सद्यस्थितीत पुलाला धोका नाही.
(२) नाही, हे खरे नाही. पुणे जिल्हयात ३१ ब्रिटीशकालीन पूल असून सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण झाले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

नंदोरी (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील शेतजमिनीतील अवैध उत्खनन

(४५) ९३३९४ (१९-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदोरी (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील सर्वे क्र.७८ या शेत जमिनीत चंद्रकांत वासाडे यांनी तत्कालिन मायनिंग अधिकारी यांच्याशी संगनमत करून बनावट कागदपत्रांच्या आधारे सन २००६ पर्यंत मायनिंग लिज काढून अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्याची मागणी शेत मालक श्री.एकरे यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त शेतात अवैध उत्खनन करणाऱ्यांवर व त्यास मदत करणाऱ्या मायनिंग अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-०१-२०१८) : (१), (२), (३) व (४) नंदोरी (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील सर्व्हे क्र.७८ बाबत शेतमालक श्री.व्यंकटेश एकरे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या निर्देशानुसार मंडळ अधिकारी नंदोरी व तलाठी, नंदोरी यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन मोजणी केली. सर्व्हे क्र.७८ व ७९ चा बांध एकच असून दोन्ही सर्व्हे क्रमांकामध्ये उत्खनन झाल्याने मोक्यावर बांध अस्तित्वात नसल्याचे तसेच दोन्ही सर्व्हेमध्ये खड्डा तयार झाल्याचे निदर्शनास आले आहे. दोन्ही सर्व्हेमधील बांध नष्ट झाल्याने सर्व्हेनिहाय झालेले उत्खनन निश्चित करता येत नाही.

श्री.व्यंकटेश एकरे यांनी श्री.चंद्रकांत वासाडे व इतर १ यांचेविरुध्द खोट्या सह्या करुन दस्तऐवज तयार करुन खनिपट्टा मिळविल्याबाबत फौजदारी दावा क्र.९८/ २००३ दाखल केला असता, सदर प्रकरणात मा.न्यायालयाने श्री.एकरे यांचा दावा फेटाळून श्री.वासाडे व इतर १ यांना दोषमुक्त केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सारुळ (ता.जि.नाशिक) येथील खडी क्रशर उद्योगाविरुध्द कारवाई करण्याबाबत

(४६) ९३४४४ (१९-०८-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक महामार्गावरील सारुळ (ता.जि.नाशिक) येथील खडी क्रशर उद्योगात करण्यात येणा-या भूमिगत स्फोटाच्या हाद-यांनी परिसरातील घरांच्या भिंतीना तडे जाऊन घरे कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याचे तसेच परिसरातील विहिरीच्या पाण्याची पातळी खालावल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील शेतकरी व ग्रामस्थांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान या प्रकरणी लेखी निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त उद्योगाविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१८) : (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) व (३) होय.

मौजे सारुळ, ता.जि.नाशिक येथील ग्रामस्थांनी दि.१० मे,२०१७ रोजी जिल्हाधिकारी, नाशिक यांना निवेदन दिले आहे. सदर निवेदनानुसार तहसिलदार, नाशिक यांनी दि.१५ मे,२०१७ रोजी स्थळ पाहणी केली असून सदर परिसरात दगडखाणींच्या बोअर ब्लास्टींगमुळे परिसरातील घरांच्या भिंतींना तडे गेल्याचे अथवा परिसरातील घरे कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता असल्याचे आढळून आले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाच्या मालकीच्या येरवडा येथील जमिनीबाबत

(४७) ९३६४३ (१९-०८-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या मालकीची येरवडा येथील जमीन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुणे महापालिकेला भाडेतत्वावर देण्यात आली होती सदर जमीन महापालिकेने कोणतीही पूर्वपरवानगी न घेता परस्पर सेंटर फॉर डेव्हलपमेंट अँड ऍडव्हान्स कॉम्प्युटिंग (सीडॅक) या संस्थेला भाडेतत्वावर दिली असल्याचे दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हा प्रशासनाने नोटीस बजावली असून नोटीसची मुदत संपल्यानंतरही महापालिकेने त्यावर उत्तर दिले नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०५-०१-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) मौजे येरवडा, ता.पुणे शहर येथील स.नं.११५/२ एकूण क्षेत्र २ हे. ४० आर क्षेत्रापैकी ८० आर क्षेत्र भोगाधिकार मूल्यरहित सारा माफीने शाळा इमारती करीता व उर्वरित १ हे. ६० आर क्षेत्र क्रीडांगणासाठी रु.१/- नाममात्र भाडे आकारुन १५ वर्ष मुदतीचे भाडेपट्टयाने पुणे

महानगरपालिकेस विहित अटी व शर्तीवर प्रदान करण्यात आलेले होते. क्रीडांगणासाठी प्रदान केलेल्या १ हे. ६० आर क्षेत्रापैकी २ एकर क्षेत्र पुणे महानगरपालिकेकडून सी-डॅक या संस्थेस शासनाची पूर्वपरवानगी न घेता परस्पर भाडेपट्टयाने देण्यात आलेले होते. सदर प्रकरणी शर्तभंग झालेला असल्याने जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.१४/०७/२०१७ रोजी उक्त क्षेत्र काढून घेऊन सरकारजमा करणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई सबर्बन डिस्ट्रीक व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन (कोरा केंद्र) या संस्थेने जमिनीचा गैरवापर केल्याबाबत

(४८) ९४२८१ (१९-०८-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप (कांदिवली) मुंबई येथील सर्वे क्र. ४० व ४१ तसेच शिंपवली येथील सर्व्हे क्र. १९, २०/१अ व २०/२ या भाडेतत्वावर घेतलेल्या भुखंडाचा मुंबई सबर्बन डिस्ट्रीक व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन (कोरा केंद्र) या संस्थेने गैरवापर करून शासनाचा महसुल बुडविल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने शासनाची परवानगी न घेता जमीनीचा काही भाग विकासकाला विकला असल्याचेही माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार उक्त संस्थेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१७) : (१), (२), (३) व (४) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २५/०९/१९५८ अन्वये मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन (कोरा केंद्र) या संस्थेला कोरा केंद्र खार जमीन योजनेतून ३५३ एकर १९ गुंठे जमीन प्रदान करण्यात आली असून जमीन प्रदान आदेशामध्ये विविध अटी व शर्ती अंतर्भूत करण्यात आल्या होत्या.

तहसिलदार बोरीवली व तलाठी सजा कांदिवली यांनी पंचांसमवेत दि. १०/०१/२०१६ व ११/०१/२०१६ रोजी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन (कोरा केंद्र) या संस्थेला दिलेल्या जागेपैकी मोकळ्या जागेचा लग्न समारंभ, नवरात्रोस्तव तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रम या प्रयोजनार्थ वापर होत असून सदर वापराबाबत संबंधितांकडून मोठ्या प्रमाणावार भाडे आकारल्या जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

सदर शर्तभंगाबाबत मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन (कोरा केंद्र) या संस्थेला नोटीस देण्याची व सुनावणीअंती नियमानुसार संस्थेविरूध्द योग्य ती कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुलूंड (मुंबई) येथील मराठा मंडळ संस्थेस शासनाने दिलेल्या जमिनीबाबत

(४९) ९४४४८ (१९-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलूंड (पुर्व),मुंबई येथे मराठा समाजाच्या उन्न्त्तीसाठी मराठा मंडळ, मुलूंड (धर्मादाय नोंदणीकृत एफ.५५५१) या संस्थेस राज्य शासनाने वसतिगृह, वाचनालय व इतर सामाजिक उपक्रम राबविणेसाठी सवलतीच्या दरात भुखंड दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहू भुखंडाचा कार्यकारी मंडळाकडून सामाजिक उपक्रमांकरीता वापर न होता वाणिज्यिक वापर करून गैरव्यवहार करण्यात येत असल्यामुळे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये आयकर विभागाने धाड टाकली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या टाकलेल्या धाडी प्रकरणी सनदी लेखापाल यांनी दिलेल्या अहवालाची माहिती लेखी व माहितीच्या अधिकारात सातत्याने मागितली असता कार्यकारी मंडळाने सदरची माहिती दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर माहिती न देण्याची कारणे काय आहेत, तसेच संस्थेच्या सभासदांनी याविरूध्द सहा. धर्मादाय आयुक्त वरळी,मुंबई यांचेकडे दिनांक १७ जून, २०१७ रोजी मराठा मंडळ या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा लावण्यासंदर्भात तक्रार अर्ज दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मंडळाच्या दोषी कार्यकारी पदाधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१७) : (१) मौजे मुलुंड मधील स.नं. १२१ ते १२३ मधील सुधारित अभिन्यासातील भूखंड क्र. १३ हा शासन ज्ञापन दि. २८/४/१९८९ अन्वये मराठा मंडळ, मुलुंड या संस्थेस विद्यार्थी वसतीगृह, वाचनालय, सांस्कृतिक केंद्र इ. प्रयोजनार्थ प्रदान करण्यास काही अटी व शर्तीस अधिन राहून शासनाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार सदर १५५०.७५ चौ.मी. मिळकतीचा ताबा संस्थेस दि. २९/१२/१९८९ रोजी देण्यात आला आहे. तद्नंतर शासन ज्ञापन दि. २१/१०/१९९४ अन्वये भूखंड क्र. १३ चे सुधारित अभिन्यासातील रस्त्याच्या तळपृष्ठ निर्देशांकासह क्षेत्र २१७१.०५ चौ.मी. असल्याने तेवढे क्षेत्र मंजूर झाले आहे.

(२), (३), (४), (५) व (६) आयकर विभाग हा केंद्र शासनाचा विभाग असल्याने या बाबतची माहिती उपलब्ध नाही. तथापि, संबंधित संस्था व विधी व न्याय विभाग यांनी दिलेल्या अभिप्रायांनुसार दि. ११/०४/२०१७ रोजी माहितीचा अधिकार या कायद्याअंतर्गत संस्थेस या

बाबतची माहिती मागण्यात आली होती. तथापि, संस्था माहितीचा अधिकार-२००५ च्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे माहिती देण्यास संस्था बांधील नाही असे सरचिटणीस, मराठा मंडळ यांनी दि. ४/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अर्जकर्त्यास कळविले आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई या कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१अ अन्वये विशेष सर्वसाधारण सभा घेण्यासंदर्भात व इतर विनंती बाबत दि. १७/०६/२०१७ रोजी अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त (रूग्णालय), बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचेकडून दि. १७/०७/२०१७ रोजी आदेश पारीत केलेले आहेत.

मौजे कांदिवली (ता.बोरिवली, जि.मुंबई उपनगर) येथील आदिवासी वारली समाजाच्या कुळाची जमीन हडप केल्याबाबत

(५०) ९४४६४ (१९-०८-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कांदिवली, (ता.बोरिवली, जि.मुंबई उपनगर) येथील फेरफार क्र. ७८४ सर्व्हे क्र. ०४ हि.न. ३ मधील जमीन आदिवासी वारली समाजाच्या कुळाची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदिवासी वारली समाजाच्या कुळाचे (संरक्षित कुळ) नाव ७/१२ उताऱ्यामधून कमी केले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर कुळाची जमीन हडप करणा-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०६-१२-२०१७) : (१), (२), (३), (४) व (५) मौजे कांदिवली, (ता.बोरिवली, जि.मुंबई उपनगर) येथील सर्व्हे क्र. ०४ हि.न. ३ मधील जमीन फेरफार क्र. ७८४ दि. २७/०२/५५ नुसार महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ३ प्रमाणे श्री जेठ्या वारली हे नाव गा.नं.न. ७/१२ च्या इतर हक्कात "संरक्षित कुळ" म्हणुन दाखल केल होते. तद्नंतर फेरफार क्र. १५२९ अन्वये सदर जमिनीच्या इतर हक्क सदरी श्री. जेठ्या वारली यांच्या पाच वारसांच्या नावांची नोंद घेण्यात आली होती.

श्री. व्दारकादास पंचमतीया व इतर यांनी फेरफार क्र. १५२९ विरूध्द उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे अपिल दाखल केले होते. सदर अपिलामध्ये उप विभागीय अधिकारी यांनी दि. २१/०८/१९८७ च्या आदेशान्वये फेरफार क्र. १५२९ रद्द करून ५ वारसांची नावे इतर हक्कातून कमी केली. सदर आदेश पुन्हा उपजिल्हाधिकारी (अपिले), मुंबई उपनगर यांच्याकडे आव्हानित झाल्यानंतर त्यांनी दि. ४/१०/२००४ च्या आदेशान्वये उप विभागीय

अधिकारी यांचे दि. २१/०८/१९८७ चे आदेश रद्द करून फेरफार क्र. १५२९ कायम केला व त्यानुसार फेरफार क्र. १६५९, दि. २१/१२/२००४ अन्वये पून्हा उपरोक्त ५ वारसांची नावे इतर हक्कात लावली.

उपजिल्हाधिकारी (अपिले) यांचे हे आदेश अपर आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांचेकडे आव्हानित झाल्यानंतर त्यांनी दि. १४/५/२००७ च्या आदेशान्वये सदर प्रकरण उप विभागीय अधिकारी यांचेकडे फेरचौकशीसाठी पाठविले, उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीअंती दि.०२/०५/२०११ रोजीच्या आदेशान्वये श्री. जेठ्या वारली यांच्या पाच वारसांच्या नावांची नोंद गा.नं.न. ७/१२ च्या इतर हक्कातून कमी करून श्री. व्दारकादास गंगादास पंचमतीया व श्री सुरेश गंगादास पंचमतीया यांची नांवे सदर जमिनीच्या इतर हक्कात लावण्याचा निर्णय दिला आहे. सदर निर्णय उपजिल्हाधिकारी (अपिले) यांनी त्यांच्या दि. १५/१०/२०१२ रोजीच्या आदेशान्वये कायम केला आहे.

उक्त नमूद प्रक्रिया ही अर्ध-न्यायिकवत स्वरूपाची असल्याने उपजिल्हाधिकारी (अपिले) यांच्या दिनांक १५/१०/२०१२ रोजीच्या या निर्णयाविरूध्द वारली यांच्या वारसांनी सक्षम न्यायालयात दावा दाखल करणे आवश्यक होते. तथापि, तसे झाल्याचे दिसून येत नाही. तसेच जेठ्या वारली अथवा त्यांच्या वारसांनी महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम या कायद्यान्वये सदरजागेची विक्री करून मिळणेबाबत कोणत्याही सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज केल्याचे दिसुन येत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.